# ज्वारी वरील प्रमुख रोग व नियंत्रण

मोनिका बर्गे
आचार्य पदवी विद्यार्थिनी

डॉ. प्रतापसिंह चव्हाण
आचार्य पदवी विद्यार्थी

ज्वारी हे पीक भारी, मध्यम आणि हलक्या जमिनीत कमीत कमी खर्चात कोरडवाहू क्षेत्रात खरीप व रब्बी हंगामात घेतले जाते. रब्बी मध्ये पेरण्यात येणारे वाण अवर्षणास प्रतिकारक असतात. ज्वारीच्या पिकात टॅनिन नावाचे घटक कमी असल्याने त्याचा अन्न म्हणून चाऱ्यासाठी चांगला वापर करता येतो. रब्बी हंगामात हे पीक मुख्यत ऑगस्ट - सप्टेंबर महिन्यात पडणाऱ्या २५० ते ३५० मिमी पावसावर घेतले जाते. तसेच या पिकामध्ये अनेक प्रकारचे रोग त्रस्त करत असतात, त्यामुळे त्यातून आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते. या रोगांविषयी शेतकऱ्यांना वेळीच माहिती मिळाली तर ते आपले भविष्यात होणारे नुकसान टाळू शकतात. सदर रोगांची माहिती आपण या लेखाद्वारे देत आहोत.

## १. काणी

- हा रोग बुरशीमुळे होतो.
- या रोगाचा प्रसार बियाणाद्वारे होतो.

**लक्षणे:**

- कणसातील दाण्यांचे रूपांतर काणीच्या बिजांडा मध्ये होते.
- दाणे काणी व मोकळी काणीचा प्रादुर्भाव मुख्यत महाराष्ट्रात आढळून येतो.
- हे काणीयुक्त पांढरे दाणे टोकास निमुळते असून फोडले असता त्यातून काळी भुकटी पडते व हे बिजाणू बियांवर चिकटून शेतात पोहचतात.
- घरगुती बियाणे वापरल्यास, या रोगाचा प्रादुर्भाव आढळतो.

**नियंत्रण:**

- पेरणीपूर्वी ज्वारीच्या प्रती किलो बियांण्यास ४ ग्रॅम गंधक किंवा ३ ग्रॅम थायरम चोळावे.
- शेतातील काणी झालेले कणसे नष्ट करावीत.
- रोगमुक्त बियाणे वापरावे.

## २. चिकटा

- हा रोग प्रामुख्याने पाऊस पडल्यानंतर व अति थंड हवामान असल्यास आढळून येतो

**लक्षणे:**

- प्रादुर्भाव झालेल्या कणसामधून दाण्या ऐवजी चिकट द्रवाचा स्त्राव दिसून येतो त्यामुळे याला चिकटा किंवा साखऱ्या रोग असे म्हणतात.
- परागीकरण न केलेले मादी वाण संपूर्णपणे या रोगास बळी पडून दाणे भरण्यावर विपरीत परिणाम होतो.

**नियंत्रण:**

- कणसे निसवल्यावर बाविस्टीन ०.२ टक्के पहिली फवारणी व त्यानंतर १५ दिवसाने दुसरी फवारणी करावी.
- शेताच्या बांधावर वाढणारी चिकटा रोगाची पर्यायी व दुय्यम खाद्य पिके नष्ट करावी.
- रोगग्रस्त शेतातील बी वापरण्यापूर्वी ३० टक्के मिठाच्या द्रावणातून काढावे (३ किलो मीठ प्रती १० लिटर पाणी).
- पाण्यावर तरंगणारे हलके व पोचट, बियाणे काढून टाकावे. नंतर बियाणे स्वच्छ पाण्यात धुवून वाळवून पेरणीसाठी वापरावे.

## ३. तांबेरा

**लक्षणे:**

- जांभळट तांबड्या रंगाची ठिपके पानांवर दिसून येतात.
- रोगाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढल्यास पानाचा मोठा भाग व्यापला जातो.
- पानांच्या खालच्या बाजूवर लहान पुटकुळया येतात त्यामुळे संपूर्ण पानाच्या पेशी नष्ट होऊन पाने नष्ट होतात.

**नियंत्रण:**

- बुरशीरहित बियाणे वापरावे.
- पिकाची फेरपालट करावी.
- पेरणीनंतर एक महिन्याने दहा दिवसांच्या अंतराने मॅन्कोझेब २ ग्रॅम प्रती लिटर प्रमाणे फवारणी करावी.

## ४. खडखडया रोग

- हा रोग बुरशीमुळे होतो.
- हलक्या जमिनीवरील कोरडवाहू रब्बी ज्वारीचे पीक या रोगास मोठ्या प्रमाणावर बळी पडते.
- या रोगाची लागण पीक फुलोरा अवस्थेत असताना होते.
- ताटाच्या जमिनीलगतच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या कांडयाला होते.

**लक्षणे:**

- रोग ग्रस्त कांडे आतून पोकळ होतात.
- अशा कांड्यांचा उभा छेद घेतला असता आतमध्ये फक्त काळे धागे आढळून येतात.
- अशी रोग ग्रस्त झाडे वाऱ्यासोबत हलताना खडखड असा आवाज करतात म्हणून यास खडखडया रोग असे म्हणतात.
- हा रोग झाल्यास कणसात दाणे भरत नाहीत तसेच उत्पादन कमी येते.
- रोग ग्रस्त झाडे जनावरांनी खाल्यास त्यांच्या आरोग्यास धोका संभवतो.

**नियंत्रण:**

- पिकांची फेरपालट करावी.
- रोग प्रतिकारक जातीचा वापर करावा.
- पीक फुलोऱ्यात असताना पाण्याची एक पाळी द्यावी.
- या रोगाचा प्रादुर्भाव होणाऱ्या भागात स्यूडोमोनास फ्लूरोसन्स या जिवाणू जन्य घटकाची बीज प्रक्रिया करावी.

★ ★ ★

(संपर्क: +९१ )